**<u>ठळक बातम्या</u>**

- दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी दुपारी एक वाजेपर्यंत ३३ पूर्णांक ३१ शतांश टक्के मतदान

- राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे मुख्य सचिवांचे निर्देश

- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राची सर्वाधिक ७८ पदकांची कमाई

**<><><><><><>**

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी आज मतदान होत असून दुपारी १ वाजेपर्यंत एकूण ३३ पूर्णांक ३१ शतांश टक्के मतदान झालं आहे. सकाळी सात ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ६९९ उमेदवार रिंगणात असून १ कोटी ५६ लाखांहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी यासाठी चोख बंदोबस्त करण्यात आला असून, निवडणूक आयोगानं १ लाख ८० हजारापेक्षा जास्त कर्मचारी तैनात केले आहेत. या निवडणुकीत अनेक प्रमुख नेत्यांचं राजकीय भवितव्य निश्चित होणार आहे. यात आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल, दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी आणि मंत्री गोपाल राय, भाजपचे विजेंदर गुप्ता, परवेश वर्मा, रमेश बिधुरी आणि कैलाश गहलोत यांचा समावेश आहे.

**<><><><><><>**

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदिप धनखड, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना, केंद्रीय मंत्री एस. जयशंकर आणि हरदीप सिंह पुरी यांनी मतदानाचा अधिकार बजावला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना, आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी यांनीही मतदान केलं. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि ज्ञानेश कुमार, प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव पी. के. मिश्रा, दिल्ली पोलिस आयुक्त संजय अरोरा यांनी देखील सकाळीच मतदानाचा हक्क बजावला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन केलं आहे.

**<><><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत बनावट मतदान रोखण्यासाठी निवडणूक आयोग आणि दिल्ली पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणूक आयोगाकडून सर्व मतदान केंद्रावर सीसीटीव्हीद्वारे लक्ष ठेवलं जात आहे. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी बेकायदेशीर बांगलादेशी आणि रोहिंग्याविरुद्ध विशेष मोहीम सुरू केली आहे. राजधानीत बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी, त्यांना अटक करण्यासाठी आणि त्यांना हद्दपार करण्यासाठी अनेक भागात छापे टाकले आहेत. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडण्यासाठी ३० हजारांहून अधिक पोलिस कर्मचारी आणि निमलष्करी दलाच्या २२० तुकड्या दिल्लीत तैनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज दिल्ली विधानसभा निवडणुक सुरळीत पार पाडण्यात सहभागी असलेल्या मतदान अधिकारी, सुरक्षा दल आणि इतर कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचं कौतुक केलं. दिल्लीत न्यू मोती बाग इथं मतदान केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी बारावीची परीक्षा येत्या ११ तारखेपासून, तर दहावीची परिक्षा २१ तारखेपासून सुरु होत आहे. या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी
करण्याचं आवाहन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केलं आहे. नांदेड जिल्ह्यात दहावी आणि बारावी परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. तसंच तणावमुक्तीसाठी समुपदेशकांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून, जिल्ह्यातल्या विविध विकासकामांचं भूमिपूजन त्यांच्या हस्ते होत आहे. खुंटेफळ साठवण तलाव जलवाहिनी कामाचा प्रारंभ, आष्टी इथल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ मंदिर समाधी दर्शन आणि समाधी बांधकामाचं भूमिपूजन, तसंच जागतिक खो-खो स्पर्धेतल्या विजेत्या खेळाडूंचा सत्कार फडनवीस यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><><>

राज्यातल्या अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राबवल्या जाणाऱ्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. मंत्रालयात आज अल्पसंख्याक विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत मंत्रालयात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><><>

बांधकाम कामगारांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीनं करता येत असून बायोमॅट्रीक आणि कागदपत्रं तपासणी सुविधा केंद्रावर जाऊन करण्यासाठी राज्यात ३६६ तालुका सुविधा केंद्र निर्माण करण्यात आल्याचं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी म्हटलं आहे. ही सुविधा राज्यातल्या सर्व बांधकाम कामगारांना आजपासून सुरू करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक येत्या शुक्रवारपर्यंत सुरू राहणार आहे. शुक्रवारी सकाळी मल्होत्रा व्याजदरांबाबतचे समितीचे निर्णय जाहीर करतील. फेब्रुवारी २०२३ पासून रिझर्व्ह बँकेने रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवला आहे.

<><><><><><>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ७८ पदकांची कमाई केली आहे. त्यात १६ सुवर्ण, ३४ रौप्य आणि २८ कास्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्राचं तिसरं स्थान कायम असून पहिल्या स्थानावर कर्नाटक तर दुसऱ्या स्थानावर सेना दल संघाचा समावेश आहे. तसंच, मध्यप्रदेश, तामिळनाडू, मणिपूर, हरियाणा, केरळ, दिल्ली आणि पंजाब यांचा पहिल्या दहा संघांत समावेश आहे. यजमान उत्तराखंडचा संघ २७ पदकांसह पदकतालिकेत पंधराव्या स्थानावर आहे.

<><><><><><>

केंद्रसरकारतर्फे आजपासून देशव्यापी जलसंधारण यात्रा काढण्यात येत असून त्याचं उद्घाटन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते होणार

आहे. नवी दिल्लीत काल पत्रकार परिषदेत चौहान यांनी ही माहिती दिली. ‘जल लाये, धनधान्य’ अशी या यात्रेची मध्यवर्ती संकल्पना आहे. ही यात्रा ६० ते ९० दिवसांत देशभरातल्या ८०५ प्रकल्पांची माहिती देत फिरणार आहे. २६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या ६ हजार ६७३ ग्रामपंचायतींना ही यात्रा भेट देईल. ही यात्रा प्रधानमंत्री कृषी  सिंचन योजना २.० चा भाग आहे. जलसंधारण आणि मातीच्या नापिक होण्याबद्दल जनजागृती करणं हा यात्रेचा उद्देश आहे, असं मंत्री चौहान यांनी सांगितलं. या यात्रेत लोकांनी मोठ्या संख्यनं सहभागी व्हावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्यातल्या त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केलं. त्यानंतर त्यांनी उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासोबत बोटीतून संगमावर फेरी मारली. गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर प्रधानमंत्र्यांनी पूजा केली. त्रिवेणी संगमावरचं स्नान ही दैवी अनुभूती असून त्यावेळी कुंभमेळ्यात सहभागी झालेल्या कोट्यवधी भाविकांप्रमाणे आपलं मनही भक्तिमय झालं होतं, अशा भावना प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर व्यक्त केल्या. जीवनदायिनी गंगा देशवासियांना शांती, सद्बुद्धी, उत्तम आरोग्य आणि सौहार्दाचा आशीर्वाद देईल, असंही मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><><>**

अमेरिकेतून शंभरपेक्षा जास्त भारतीय अवैध स्थलांतरितांना हद्दपार करण्यात आलं असून ते आज पंजाबमधे अमृतसर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले. विमानतळावर सर्व प्रशासकीय  व्यवस्था केल्याचं उच्चपदस्थ अधिकाऱ्यानी दिली.

<><><><><>

कोल्हापूर जिल्ह्यातल्या इचलकरंजीमध्ये महाप्रसादामधून ३०० जणांना विषबाधा झाली आहे. इचलकरंजीतल्या शिवनाकवाडी गावात यात्रेनिमित्त महाप्रसादाचं आयोजन करण्यात आलं होतं. या महाप्रसादातून सुमारे ३०० ते साडे तीनशे जणांना विषबाधा झाली आहे. या सर्वांवर जिल्ह्यातल्या विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू असल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या राजुरी ते बीड या नवीन लोहमार्गावर आज हायस्पीड रेल्वेची चाचणी घेण्यात आली. हिवरसिंगा, जवळागिरी, बरगवाडी या गावातल्या वाहतुकीसाठी रेल्वे पूल नसल्यामुळे गावात नागरिकांना ये-जा करण्यासाठी अडथळा निर्माण होत असल्याचं आमदार संदीप क्षीरसागर यांनी रेल्वे वाहतूक सुरक्षा आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिलं.

<><><><><>

अखिल भारतीय उर्दु कवी संमेलनाचं आयोजन येत्या शनिवारी बीडमधल्या अमनलॉन्स इथे  करण्यात आलं आहे.

भारताचे तिसरे राष्ट्रपती भारतरत्न डॉ. जाकेर हुसेन यांच्या जयंतीनिमित्त हे उर्दु कवी संमेलन आयोजित करण्यात आलं आहे.

या कवी संमेलनामधे कवी नईम अख्तर खादमी बुरहानपुर, राहत इंदौरी यांचे पुत्र सतलज राहत इंदौरी, ताहेर सऊद बिजनौर, कलीम जावेद खिरतपुरी, अल्तमश तालेब, जुबेर गोहर हे सहभागी होणार आहेत.

//<><><><><>//